**लांजा महाविद्यालयात फिट इंडिया चळवळीचे थेट प्रक्षेपण**

लांजा येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारत सरकारने नवीनच सुरू केलेल्या फिट इंडिया चळवळीच्या शुभारंभाच्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन लांजा महाविद्यालय व मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हॉकी चे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने फिट इंडिया अर्थात सुद्दढ भारत चळवळीचा प्रारंभ केला. दिल्ली येथे झालेल्या शुभारंभ कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण लांजा महाविद्यालयात दाखविण्यात आले. यावेळी लांजा महाविद्यालय व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 10 किमी धावण्याच्या क्रॉस कंट्री स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी सहाशेपेक्षा अधिक विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयात लांजा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष श्री. सुनील कुरूप, न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. जयवंत शेट्ये, सहसचिव श्री. संजय तेंडुलकर, संचालक श्री चंद्रकांत परवडी, मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. अम्रुले, प्राचार्य डॉ. अरविंद कुलकर्णी, लांजा व मुंबई विद्यापीठ अंतर्गत विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व खेळाडू उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सिद्धेश खवळे यांनी केले व आभार प्रा. अवंतिका केळुसकर यांनी केले.